<u>नि.दि.अ.नं. २४/२०१८</u>
दत्तात्रय शिंदे वि. सुधाकर पाटील

<u>**निशाणी २५, २६ व २७ वरील आदेश**</u> :

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुतचे नियमीत दिवाणी अपील हे रे.दि.मु.नं. ३३१/१९८५ मधील हुकुमनाम्याविरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तूत प्रकरणातील अपेलंट नं. २ भगवान दत्तात्रय शिंदे हे दिनांक ३०/०७/२०१९ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. अपेलंट नं. २ हे कोरोना महामारीच्या काळात मयत झाल्याने त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे अपेलंट नं. २ विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होऊन त्यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांचे अर्जात नमुद केले प्रमाणे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज केले आहेत. जाबदार यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले नाही.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता, अपीलाचे काम सुरु असताना यातील अपेलंट नं. २ हे दिनांक ३०/०७/२०१९ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. प्रकरणाचे स्वरुप पहाता त्यामध्ये अपीलकार व जाबदार यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत अपेलंटचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. अपेलंट ही कोरोना काळात मयत झालेले आहेत. त्या कालावधीमध्ये मुदतीच्या कायद्यानुसार असलेल्या सर्व मुदती या स्थगीत करण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे मयताचे वारस पटलावर घेण्यास उशीर झाला व त्यामुळे मयताविरुध्द अपील अबेट झाले असे म्हणता येणार नाही. सबब, अर्ज खर्चावर मंजूर करणे योग्य होईल. सबब, आदेश.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज निशाणी २५, २६ व २७ रक्कम रु. ३०००/– खर्चावर मंजूर.

२. अपेलंट नं. २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. अर्जात नमुद केलेप्रमाणे अपीलकार यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आंत अपीलमेमोत दुरुस्ती करुन दुरुस्त अपीलनाम्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन जाबदारांना देखील पुरवावी.

४. खर्चाची रक्कम शासन जमा करण्यात यावी.

ANIRUDDHA SUBHASH GANDHI

Digitally signed by ANIRUDDHA SUBHASH GANDHI
Date: 2024.03.19 17:37:32 +0530

(अनिरुध्द सुभाष गांधी)

दिनांकः– १९/०३/२०२४ जिल्हा न्यायाधीश –१, इस्लामपूर.

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | Shri. Pradip T. Patil (Grade-I) |
| Court Name | : | Addl. Sessions Court, Islampur. |
| Date of Judgment/order | : | 19/03/2024 |
| Signed by P.O. on | : | 19/03/2024 |
| Uploaded on | : | 19/03/2024 |